नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - ३२७ Issue - 327 | वार मंगळवार दि. १५ एप्रिल २०२५ Blow- Tuesday Date 15 April 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## पश्चिम बंगालमध्ये पुन्हा हिंसाचार

### वक्फ कायद्याला विरोध ; बॅरिकेट्स तोडले, पोलिसांच्या गाड्या जाळल्या, वाहतूक ठप्प

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मंजूर झालेल्या वक्फ (दुरुस्ती) विधेयकाविरोधात देशभर संतापाची लाट उसळत असताना आता पश्चिम बंगालमध्ये दुसऱ्यांदा हिंसाचार घडला आहे. पश्चिम बंगालमध्ये सोमवारी दक्षिण २४ परगणा येथे वक्फ कायद्याच्या विरोधात निदर्शने करण्यात आली. यावेळी इंडियन सेक्युलर फ्रंट (खडक्र) आणि पोलिसांमध्ये संघर्ष झाला. टाइम्स ऑफ इंडियाने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

कोलकात्याच्या रामलीला मैदानावर आयोजित रॅलीत जाण्यापासून पोलिसंनी खडक्र कार्यकर्त्यांना रोखले. त्यामुळे हा हिंसाचार घडून आल्याचं म्हटलं जातंय. खडक्र नेते आणि भांगरचे आमदार नौशाद सिद्दीकी या कार्यक्रमात भाषण करणार होते. भांगर, मीनाखान आणि संदेशखली येथील अनेक निदर्शकांना बसंती महामार्गावरील भोजेरहाट येथे रोखण्यात आलं. बॅरिकेट्स तोडण्याचा प्रयत्न झाल्याने ताणवही निर्माण झाला. परिणामी संघर्ष वाढत गेला. अनेक पोलीस वाहने जाळण्यात आली असून पोलीस अधिकारी जखमी झाले आहेत. जमावाला पांगवण्याकरता पोलिसांनी लाठीमार केला. यामध्ये एका खडक्र समर्थकाच्या डोक्याला दुखापत झाली आहे.



आंदोलकांनी काही पोलीस वाहने जाळली आणि पोलिसांवर हल्ला केला. त्यामुळे काही पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत, असं एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितलं. या हिंसाचारामुळे वाहतूक ठप्प झाली होती. त्यामुळे मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. निदर्शकांना अखेर परिसरातून हटवण्यात आले आहे.


वक्फ दुरुस्ती कायद्याविरोधात सुरू असलेल्या आंदोलनाला हिंसक वळण लागल्यानंतर हा कायदा पश्चिम बंगालमध्ये लागू करणार नसल्याची घोषणा मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी शनिवारी केली. हा कायदा आम्ही नाही तर केंद्र सरकारने केला असे त्यांनी स्पष्ट केले. समाजकंटकांवर कठोर कारवाईचा इशाराही त्यांनी दिला.

**हिंसाचार प्रकरणी १५० जणांना अटक**

वक्फ कायद्याविरोधात मुशिर्दाबादमध्ये हिंसाचार उफाळून आला होता. यावेळी येथे तिघांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर आज पुन्हा हिंसाचार उफाळून आला आहे. याप्रकरणी पश्चिम बंगाल पोलिसांनी १५० जणांना अटक केली असून समसेरगंज, धुलियान, सुती आणि जवळच्या भागात पोलीस तैनात करण्यात आले आहेत.

## आता टोल नाक्यांवर थांबावे लागणार नाही; केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची मोठी घोषणा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : 'आता जितका प्रवास, तितकाच पथकर द्यावा लागेल. या नवीन धोरणाची अंमलबजावणी १५ दिवसांत केली जाईल', अशी घोषणा केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी सोमवारी केली. दादर येथील अमरहिंद मंडळाच्या ७८व्या वसंत व्याख्यानमालेत ते बोलत होते. पथकर नाक्यांवर वाहनांना थांबावे लागू नये, यासाठी उपग्रहआधारित पथकराची व्यवस्था केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी घोषणा केली आहे की, लवकरच 'जितका प्रवास, तितकाच पथकर' हे नवीन धोरण लागू होणार आहे. येत्या १५ दिवसांत उपग्रह आधारित पथकर प्रणाली सुरू होईल, ज्यामुळे टोल नाक्यांवर वाहनांना थांबावे लागणार नाही. रस्ते विकासासाठी ३ लाख कोटींची तरतूद असून, राष्ट्रीय महामार्गांवर किलोमीटरनुसार पथकर आकारला जाईल.

'रस्ते बांधणीसाठी यंदा ३ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या माध्यमातून नवे रस्ते बांधले जात असताना भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणांच्या रस्त्यावर जितके किलोमीटर गाडी चालवली जाईल, तितकाच पथकर घेतला जाईल, असे धोरण लवकरच आणण्यात येणार आहे', असे गडकरी म्हणाले.

'विकासाचा संबंध रस्त्यांशी आहे. देशाची अर्थव्यवस्था मजबूत करण्यात रस्ते, महामार्गांचा मोठा वाटा आहे. देशातील दळणवळणाचा खर्च कमी होणे आवश्यक असून, ते रस्त्यांद्वारेच शक्य आहे. सध्या प्रगत देशाच्या तुलनेत दळणवळणाचा खर्च आपल्याकडे अधिक आहे. तो सध्याच्या १६वरून नऊ टक्क्यांवर आणला जाणार आहे', असे गडकरी यांनी सांगितले. 'आपण दरवर्षी २२ लाख कोटी रुपयांचे खनिज तेल आयात करतो. २००४पासून पेट्रोल आणि डिझेलच्या पर्यायाची चाचपणी करीत आहोत. आता शेतकऱ्यांनी पर्यायी ऊर्जेची निर्मिती करण्याची वेळ आली आहे. त्यासाठी इथेनॉलबरोबरच हायड्रोजन बायो फ्युएल वापरायला सुरुवात होणार आहे. कचऱ्यापासून मिथेन जैवइंधन तयार करण्यासाठी ४०० कारखाने सुरू होणार असून, त्यातील ९० कारखाने सुरू आहेत. भाताचे धांड जाळून प्रदूषण होण्यापेक्षा त्यातून इंधन बनवण्यावर भर दिला जाईल', असेही त्यांनी सांगितले. भविष्यात भारताला जलमार्ग बांधावे लागतील. येणाऱ्या काळामध्ये १०८ जलमार्गांची निर्मिती हे लक्ष्य असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

## संयुक्त महाराष्ट्र आंबेडकरांच्या विचारातूनच : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : 'मुंबई ही महाराष्ट्राची आहे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ठणकावून सांगितले होते. मुंबई आणि महाराष्ट्र हे एकमेकांत रमलेले आहे. भाषावार प्रांतरचनेत मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या इरलर-ारहशल ालशवज्ञरी विचारातूनच झाली', असे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उच् ऊर्ज्ञीशप-वीर ऋरवपर्रीळी यांनी मुंबई आणि बाबासाहेब यांचे अतूट नाते अधोरेखित केले.

वडाळा पूर्व येथील कोरबे मिठागर भागात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सोमवारी करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमास व्यासपीठावर सांस्कृतिक कार्यमंत्री ड आशीष शेलार, आमदार कालिदास कोळंबकर, आमदार कॅप्टन तमिल सेल्वन आदी उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री म्हणाले, 'मुंबईतील त्यांच्या कार्यकर्तृत्वाला उजळा देण्यासाठी राज्य शासन इंदू मिल येथे त्यांचे भव्य स्मारक साकारत आहे. त्यांनी दिलेली राज्यघटना ही जगातील सर्वोत्तम आहे. राज्यघटनेच्या तत्त्वावर देशाचा कारभार सुरू आहे. या राज्यघटनेनेच देशाच्या महासत्तेचा मार्ग प्रशस्त केला आहे. बाबासाहेबांचा पुतळा हा राज्यघटनेशिवाय अपूर्ण असतो. त्यांनी त्या माध्यमातून शोषित, पीडितांना न्याय देण्याचे काम केले. राज्यघटनेने सर्वांना समान संधी उपलब्ध करून दिली. यातून त्यांची दूरदृष्टी आणि प्रगल्भता लक्षात येते.'

'डॉ. बाबासाहेबांचा मॅट्रिक उत्तीर्ण झाल्यानंतर पहिला सत्कार मुंबईत झाला. एवढेच नव्हे तर, केंद्रीय मंत्री, प्रांतिक अध्यक्ष, गोलमेज परिषदेवरून देशात परत आल्यावर, राज्यघटना पूर्ण करून परत आल्यानंतर अशा अविस्मरणीय क्षणी बाबासाहेब आंबेडकर यांचा सत्कार मुंबईमध्येच झाला. बाबासाहेब यांनी वयाची ५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल चैत्यभूमीवर अभिवादन सभाही मुंबईतच पार पडली होती,' असे मुख्यमंत्री म्हणाले.

## वृद्ध दापत्यांना धमकावून चोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या चोरट्यांना निफाड पोलिसांनी केले जेरबंद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील गाजरवाडी शिवारात रात्रीच्या वेळी घरात घुसून चोरट्यांनी वृद्ध दापत्यांना हातातील धारदार शास्त्राचा धाक दाखवत जीवे मारण्याची धमकी देत चोरी करण्याचा प्रयत्न केला असून या घटनेचा निफाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे,

सविस्तर वृत्त असे की गाजरवाडी शिवारात रात्री साडेदहा वाजेच्या सुमारास तिघांनी काळे कपडे घालून व एकाने पोपटी रंगाचे कपडे घालून हातात लोखंडी धारदार कोयते घेऊन चोरटयांनी घरात प्रवेश केला फिर्यादीची पत्नी व नातू यांना दोन चोरट्यांनी दाबून धरले व फिर्यादीस दोघा चोरट्यांनी दाबुन धरत तोंडाला चिकटटेप लावण्याचा प्रयत्न केला व आम्ही तुम्हा तिघांनाही मारून टाकू असा दम दिला. या झटापटीत चोरट्याने फिर्यादीचे हातावर कोयत्याने मारून त्यांना जखमी केले आहे या घटनेची नोंद निफाड पोलीस ठाण्यात करण्यात आली असून गुरनं.१०५/२०२५बि.एन.एस.११८(१),३३३,३५१(२),३(५),३०९(६),६२, याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे वरील आरोपी हे सराईत गुन्हेगार आहे त्यांचे कडून विंचूर निफाड येथील चोरीच्या एकूण पाच मोटरसायकल जप्त करण्यात आले असून दोन लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, या गुन्ह्यातील आरोपी हे सराईत गुन्हेगार असून त्यांनी त्र्यंबकेश्वर ,हरसुल, निफाड, लासलगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्हे केल्याची कबुली दिली आहे. नासिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने, अप्पर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ .निलेश पालवे, निफाड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश गुरव ,सहा.पो. नि. ईश्वर पाटील, तपासी अंमलदार पोलीस उपनिरीक्षक विश्वनाथ निकम ,पो. हवा. किरण ढेकळे ,कपालेश्वर ढिकले, अनिल शेरेकर ,संजय वाघ ,रवींद्र बारहाते, पो.ना, नितीन सांगळे, सारिका जाधव ,मनीषा गायकवाड, पुनम शिंदे, पो. शि. विनोद जाधव, राजेंद्र दरोडे ,धनंजय जाधव ,स्वप्निल शिरसाट, योगेश आव्हाड, विक्रम लहाने तसेच नाशिक ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेकडे तांत्रिक विश्लेषण कर्मचारी प्रदीप बहिरम ,हेमंत गिलबिले, यांचे पथकाने वरील संशयित आरोपी व गुन्हेतील कोयता व पाच मोटरसायकल असे एकूण दोन लाख पन्नास हजार रुपयांचा मुद्देमाल २४ तासाच्या हस्तगत करून सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विश्वनाथ निकम हे करीत आहे,




## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन व संविधान वाचन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग शासन निर्णय अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व वंचित दुर्बल घटकातील व्यक्तींच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी राज्य शासनाकडून विविध कल्याणकारी योजनांची माहिती सर्वसामान्य जनतेला व्हावी तसेच जनतेत जनजागृती निर्माण व्हावी याउद्देशाने दरवर्षी दि.०८ एप्रिल ते १४ एप्रिल या कालावधीत राज्यात भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह हा कार्यक्रम साजरा करण्यासाठी राज्यातील सर्व प्रशासकीय विभागाच्या अधिनस्त सर्व कार्यालयांनी व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी, यांनी त्यांच्या अधिनस्त असणा-या सर्व कार्यालयांना विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे निर्देशानुसार सहायक समाज कल्याण कार्यालय सोलापूर यांच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता कार्यक्रम या कार्यक्रमांतर्गत सोमवार दि. १४ एप्रिल २०२५ रोजी जयंतीनिमित्त पार्क चौक सोलापूर येथे सकाळी ९ वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, आयुक्त, म.न.पा. डॉ. सचिन ऑंबासे, पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधिक्षक सोलापूर अतुल कुलकर्णी, यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



सदर कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते संविधान वाचनकरून बौद्धवंदना करण्यात आली त्यानंतर मान्यवरांना भारतीय संविधानाची प्रत व पुष्पगुच्छ सहायक आयुक्त समाज कल्याण श्रीमती सुलोचना सोनवणे यांच्या हस्ते देण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय सोलापूर यांनी केले असून कार्यक्रमास सहायक संचालक इतर मागास बहुजन कल्याण सोलापूर मनीषा फुले, संशोधन अधिकारी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती सचिन कवले, व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयातील कर्मचारी, तालुका समन्वयक, महामंडळाचे व्यवस्थापक, प्रकल्प अधिकारी, समतादूत व वसतिगृहाचे विदयार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन राजश्री कांबळे यांनी केले.

अशी माहिती सहाय्यक आयुक्त समाज कल्याण सोलापूर श्रीमती सुलोचना सोनवणे यांनी दिली .

### श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या पादुकांचे मंदिर समितीच्या वतीने पूजन

### पंढरपूर ते लंडन दिंडीचे प्रस्थान

## लंडन येथे श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे भव्यदिव्य मंदिर साकारणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विठ्ठल भक्त अनिल एकनाथ खेडकर मुळ गांव अहिल्यानगर असून सध्या लंडन, युके येथे स्थायिक आहेत, ते युके म्हणजेच लंडन येथे श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे भव्यदिव मंदिर साकारणार आहेत. त्यानिमित्ताने आज पादुकासह दिंडी श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरात आल्यानंतर मंदिर समितीच्या वतीने त्यांचेकडील पादुकांचे मंदिर समितीच्या वतीने सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते पुजन करण्यात आले.

यावेळी मंदिर समितीच्या सदस्या शकुंतलाताई नडगिरे, ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखा अधिकारी मुकेश अनेचा व विभाग प्रमुख पांडूरंग बुरांडे तसेच अनिल खेडकर उपस्थित होते.



महाराष्ट्र राज्याचे आराध्य दैवत असलेले पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर, आणि वारीची, संत परंपरेची गाथा आता जगभरात पोहोचणार असून काही वर्षात युके म्हणजेच लंडन येथे श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे भव्यदिव मंदिर श्री विठ्ठल भक्त अनिल खेडकर साकारणार आहेत.

यानिमित्ताने १४ एप्रिल ते २१ जून २०२५ दरम्यान पंढरपूर ते लंडन अशी आंतरराष्ट्रीय दिंडी निघणार आहे. यासाठी लंडन येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर टीम प्रयत्नशील आहे. याबाबत माहिती देताना अनिल खेडकर म्हणाले, मी गेल्या ७ वर्षांपासून आळंदी ते पंढरपूर पायी अशी वारी करत आहे. अमेरिका, यूरोप, लंडन येथे अनेक भारतीय मंदिरे आहेत. इस्कॉन, अक्षरधाम तसेच राजस्थान येथील देवतांची मंदिरे परदेशात आहेत पण एवढी जुनी संत साहित्य परंपरा असलेले पंढरपूर येथील मंदिर नाही, यासाठी वारी साता समुद्रापार नेण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. वारीतील प्रेम, जिव्हाळा, सलोखा मी अनुभवला आहे. याचा लाभ जगभरात व्हावा ही प्रामाणिक ईच्छा आहे असे ते म्हणाले. खरेतर दिंडीतील पादुका विमानातून लंडन येथे जाऊ शकतात, पण समर्पण म्हणून सुखी संसाराची वाट सोडून लाखो भाविक पायी वारी करतात, यासाठी सुमारे २२ देशातून १८००० किलोमीटर चा प्रवास करत ही दिंडी निघणार असून भक्तीची परंपरा भारता बाहेर पोहोचणार आहे. त्यासाठी सर्व देशांचा व्हिसा, वाहनांचे परमिट व इतर अनुषंगिक कायदेशीर तयारी त्यांनी केली आहे.

दिनांक १४ एप्रिल रोजी श्रीक्षेत्र पंढरपूर येथून दिंडी मार्गस्थ झाली आहे. दि. १८ एप्रिल रोजी भारत सोडून नेपाळ, चीन, रशिया, जर्मनी अशा २२ देशातून ७० दिवसात १८ हजार किमी एवढा प्रवास करत कारने या पादुका घेऊन जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे, अशी माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

## संपादकीय....

# राणाची चौकशी

मुंबई हल्ल्याचा मास्टरमाइंड तहव्वूर राणा याने आणखी एका दहशतवादी हल्ल्यासाठी नवी दिल्लीची निवड केली होती. दिल्लीच्या एका न्यायालयाने आपल्या आदेशात हे म्हटले आहे. न्यायालयाने म्हटले की, राणाचा कट फक्त मुंबईपुरता मर्यादित नव्हता. हे षडयंत्र भारताच्या भौगोलिक सीमांच्या पलीकडेही पसरले होते. तपास संस्था एनआयएला यासाठी पुरेसे पुरावे सापडले आहेत. विशेष एनआयए न्यायाधीश चंद्रजित सिंह यांनी १० एप्रिलला हा आदेश दिला. राणा यांच्यावरील आरोप राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. तहव्वूर राणा सध्या दिल्लीत एनआयए कोठडीत आहे. त्याच्यावर भारतात दहशतवादी हल्ल्याचा कट रचल्याचा आरोप आहे. न्यायालयाने एनआयएला राणाची चौकशी करण्याची परवानगी दिली आहे. एनआयए आता राणाची चौकशी करेल आणि कटाचा विविधांगी तपास करणार आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, विशेष एनआयए न्यायाधीश चंद्रजीत सिंह यांनी १० एप्रिलला एक आदेश दिला आहे. १२ पानांच्या आदेशात न्यायाधीशांनी असेही म्हटले आहे की, रेकॉर्डवरील पुरावे दर्शवितात की, तहव्वूर राणाचा कट भारताच्या सीमेपलीकडे पसरला होता. कट रचणारे नवी दिल्लीसह भारतातील अनेक शहरांवर हल्ला करण्याची योजना आखत होते. न्यायाधीशांनी असेही नमूद केले की, कटाची खोली जाणून घेण्यासाठी राणाची सतत चौकशी करणे आवश्यक आहे. न्यायालयाने राणाला १८ दिवसांची एनआयए कोठडी सुनावली आहे. न्यायाधीशांनी सांगितले की, कटासंदर्भात साक्षीदार, फॉरेन्सिक पुरावे आणि कागदोपत्री पुरावे सादर करावेत. यामुळे या प्रकरणातील सत्य बाहेर येऊ शकेल. न्यायाधीशांनी असेही म्हटले की, एनआयएने दर ४८ तासांनी राणाची वैद्यकीय तपासणी करावी. वरिष्ठ वकील ज्ञानकृष्णन आणि विशेष सरकारी वकील नरेंद्र मान यांनी न्यायालयात एनआयएची बाजू मांडली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, तपासाचा भाग म्हणून एनआयए राणाला हल्ल्याचा कट रचलेल्या ठिकाणी घेऊन जाऊ शकते. यामुळे तपास यंत्रणेला कटाबद्दल अधिक माहिती मिळण्यास मदत होऊ शकते. एनआयए घटनास्थळांचे नाट्यीकरण देखील करू शकते. यामुळे एनआयएला दहशतवादी टोळीबद्दल सखोल माहिती मिळू शकेल. पाकिस्तानी वंशाचा कॅनेडियन नागरिक तहव्वूर राणा हा मुंबई हल्ल्याचा मुख्य सूत्रधार आहे. तो अमेरिकन नागरिक डेव्हिड कोलमन हेडलीचा जवळचा सहकारी देखील आहे. प्रत्यार्पण करारांतर्गत राणाला अमेरिकेतून भारतात आणण्यात आले आहे.

# धावत्या एसटी बसला अचानक आग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : धावत्या एसटी बसने अचानकपणे पेट घेतल्याने सोलापूर अक्कलकोट महामार्गावर बर्निंग बसचा थरार पाहावयास मिळाला आहे. कुर्डुवाडी ते अक्कलकोट व्हाया सोलापूर या बसने पेट घेतला होता.

सोलापूरहुन अक्कलकोटकडे जाताना एसटी बसला कुंभारी टोल नाक्याच्या अलीकडे आग लागली. बसमध्ये ४५ ते ५० प्रवासी प्रवास करत होते. बस चालकाने प्रसंगावधान राखत वेळीच बस थांबवून प्रवाशांना सुचित करत सुखरूप बाहेर काढल्याने मोठी दुर्घटना टाळली. ही आग शॉर्ट सर्किटने लागल्याची प्राथमिक माहिती एसटीच्या अधिकाऱ्यांनी दिली. यात बस पूर्णतः जळून खाक झाली आहे. ही घटना सोमवारी सायंकाळी सव्वा सहा वाजेच्या सुमारास घडली आहे. कुर्डवाडीहुन अक्कलकोटकडे निघालेली बस सोलापूरला बस आली. सोलापूरहुन अक्कलकोट जाणारी एसटी (क्रमांक एम एच २० बी एल ४२१५) ही कुंभारी टोलनाक्याजवळ पोहचली.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक व्यक्ती नसून एक विचार आहे !

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन म्हणजे भारतीय जनतेच्या न्याय व समतेसाठी लढयाची अविस्मरणीय गाथाच होय. दलितोत्ध्दारक, धर्मसुधारक, प्रकांडपंडीत, समाजशास्त्रज्ञ व संविधानाचे शिल्पकार असे विविध पैलू त्यांच्या जीवनाशी निगडीत आहेत. अशा या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचा विचार करता, तत्कालीन सामाजिक, राजकिय प्रश्नांना ते कसे सामोरे गेलेत या प्रश्ना प्रमाणेच राष्ट्रीय एकात्मतेचा विचार ही त्यांनी केला. या सर्व बाबींचा मागोवा घेणे अभ्यासाचा विषय आहे. तेव्हा आपला समाज एक संघ असला पाहिजे, यावर त्यांचा अधिक भर होता. सर्व समाज शहाणा करुन सोडावा ही त्यांची कल्पना होती. तीच त्यांनी संविधानेत साकारली जे-जे आपणांसी ठावे, ते-ते इतरांशी सांगावे, शहाणे करुनही सोडावे सकल जण हा रामदासांचा संदेश त्यांनी आचरणात आणला आणि इतरांना सुध्दा सांगितला, या संदेशाकडे डोळेझाक करुन चालणार नाही.

स्वत: बरोबर इतरांचा विचार करुन त्यांनी राष्ट्रनिष्ठे पुढे इतर निष्ठा गौण मानल्या. आपण सर्व भारतीय आहोत ही भावना रुजविणे व वाढविणे महत्वाचे आहे. या निष्ठेपुढे कोणतीही निष्ठा स्पर्धा करु शकत नाही. संकुचित जातीय, धार्मिक किंवा राजकिय व अन्य स्वार्थासाठी त्यांनी राष्ट्रनिष्ठा सोडली नाही. त्यांची ही भावना स्वातंत्र्योत्तर काळात सत्तेत सहभागी होतांना (कायदामंत्री) असतांना शेडयुल्ड कास्ट फेडरेशन काढतांना, धर्मांतराची घोषणा करतांना अशा महत्वाच्या जीवनप्रसंगी सतत निष्ठा जागी राहिल्याचे दिसेल. त्यामुळे खऱ्या अर्थाने त्यांना राष्ट्रपुरुष संबोधले गेले पाहिजे. त्याला कारण ही तसेच! ते म्हणाले, मी प्रथम भारतीय आणि शेवटपर्यंत भारतीयच! अशा महान विद्यात्याला वगळून खरोखरच हा देश मोठा झाला असता काय? याचा गंभीरपणे विचार करणे गरजेचे आहे.

डॉ. आंबेडकरांनी स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता या लोकशाही तत्त्वांचा पुरस्कार करणारे अनेक ग्रंथ लिहिले, भाषणे दिली आणि आपली दलिताबद्दलची भूमिका स्पष्ट केली. त्यांच्या प्रेरणेने शाळा, प्र-शाळा तर निघाल्याच पण उच्च शिक्षण देणारी महाविद्यालयेही निघाली. शिक्षण, समाजकल्याण, अर्थकरण, राजकरण या सर्वामध्ये त्यांनी आपले स्वतंत्र, तर्कशुध्द विचार मांडून दाखविले. त्यांच्या ठायी असलेल्या अर्थकारणामुळे भारतीय रिजर्व्ह बँक उदयास आली, हे ही विसरुन चालणार नाही. दलित समाजात जागृती होत गेली तेव्हा त्यांना ज्ञानाचे महत्व पटले. अनेक दलित आज समाजात विचारवंत म्हणून मान्यता पावले आहेत, त्यामागे डॉ बाबासाहेबांची प्रेरणा आहे. समाजाने त्यांच्या विषयीचा आदर अनेक प्रकारे व्यक्त केला आहे. आज त्यांचे नाव दिलेली कितीतरी विद्यालये, महाविद्यालय, विद्यापीठे कार्यरत आहेत. ही त्यांच्या विद्वत्तेची पावती म्हणावी लागेल, जी जगमान्य ठरली. कितीतरी विद्यार्थ्यांनी त्यांच्या विषयावर डॉक्टरेट मिळविणाऱ्यांची संख्या ज्याची मोजदाद करता येणार नाही. त्यामुळे त्यांच्या विद्वत्तेची प्रचिती लक्षात येते.

डॉ. बाबासाहेबांनी बडोदे सरकारची शिष्यवृती मिळवून एल्फिन्स्टन कॉलेजात प्रवेश घेतला. कॉलेजात शिक्षण देखील भीमा महार असल्यामुळे त्याला योग्य मार्गदर्शन व मदत मिळाली नाही. तरीही तशाच परिस्थितीत भीमराव एल्फिन्स्टन कॉलेज मधुन १९१२ साली बी.ए. झाले. बडोद्याच्या महाराजांच्या ऋणातून अल्पसे मुक्त होण्यासाठी त्यांनी त्यांचे कडे नोकरीचा अर्ज केला त्यांना सयाजीराव गायकवाडांच्या कडे नोकरी मिळाली. परंतु वडील आजारी असल्याची तार मिळताच डॉ. आंबेडकर मुंबईस निघाले. सुरत स्टेशनवर वडिलांसाठी बर्फी घ्यावी म्हणून ते उतरले असताना गाडी निघून गेली. त्यामुळे घरी पोहोचण्यास त्यांना उशीर झाला. वडिलांचे डोळे मुलाला पाहण्यासाठी आतूर झाले होते. मुलगा आल्याचे कळताच त्यांनी डोळे उघडले. आपल्या लाडक्या मुलाच्या अंगावरुन प्रेमाने हात फिरविला आणि त्या महान पुरुषाने हया जगाचा शेवटचा निरोप घेतला.

पुढील शिक्षणासाठी बडोद्याचे प्रागतिक राजे सयाजीराव गायकवाडांनी शिष्यवृत्ती देऊन त्यांना अमेरिकेत पाठविले. आपण केवळ शिक्षणासाठी अमेरिकेत आलो आहोत याची जाणीव भीमरावांना होती. एखाद्या तपस्व्या प्रमाणे त्यांनी उपासना केली. ते अभ्यासात दिवसाचे अठरा तास घालवू लागले. १९१५ साली ते एम.ए. झाले. पैसा जमवला व १९२० साली ते अपुरा अभ्यास करण्यासाठी पुन्हा एकदा लंडनला रवाना झाले. तिथे ते सकाळी आठ ते संध्याकाळी पाचपर्यंत निरनिराळया ग्रंथालयात पुस्तके वाचीत आणि रात्री दहानंतर दिवस उजाडेपर्यंत त्यांचा अभ्यास चालू असे. १९२३ मध्ये लंडन विद्यापीठाने त्यांना दिलेली डॉक्टर ऑफ सायन्स' ही पदवी होय. त्यानंतर त्यांनी निरनिराळया विषयांवर दोन-तीन प्रबंध लिहिले. हया कष्टांचे फळ म्हणून १९२४ साली कोलंबिया विद्यापीठाने त्यांना डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी ही पदवी दिली.





– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

सामाजिक समतेसाठी त्यांनी महाडच्या तळयातील सर्वांसाठी म्हणजेच अस्पृश्यांना पाणी मिळत नव्हते. पाणी म्हणजे जीवन, तेच त्यांच्यापासून हिरावून घेतले यासाठी सत्याग्रह करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. मार्च १९२७ रोजी सत्याग्रही तळयाकडे निघाले. माणुसकीचे हक्क व निसर्गाची देणगी जे पाणी, ते मिळवायचेच एवढयासाठी चालेले होते. डॉ. आंबेडकर सर्वांच्या पुढे होते. अस्पृश्य म्हणून मुंबईच्या कॉलेजात ज्यांनी पाण्याचे हाल सोसले, बडोद्याच्या हॉटेलमध्ये ज्यांनी मार खाल्ला ते खरोखरच सत्याग्रहींचे सेनापती शोभत होते. सर्वजण तळयाजवळ येऊन पोहोचले. प्रथमत: त्यांनी पाण्याचा घोट घेऊन इतरांना पाणी पिण्याची मोकळीक दिली. तसेच नाशिकच्या काळाराम मंदिरात प्रवेश मिळवण्यासाठी ५ वर्षे सतत झगडत राहिले शेवटी १९३५ मध्ये काळाराम मंदिर अस्पृश्यांसाठी खुले करण्यात आले. अन् त्याचवेळी बौध्द धर्म स्विकारणार अशी घोषणा त्यांनी येवले (नाशिक) या ठिकाणी केली. लगेच त्यांनी सिडेनहॅम कॉलेजमध्ये प्राध्यापकाची जागा मिळवली. बहिष्कृत वर्गावर वर्षानुवर्षे जो अन्याय होत आलेला आहे तो वेशीवर टांगून त्याचे निराकरण झाले पाहिजे ही त्यांची मागणी होती. बहिष्कृतांचा हा लढा लढतांना त्यांनी नेमकी विधायक आणि व्यापक भूमिका घेतली आणि अस्पृश्य समाजाला स्वत: हुन काही करावेसे वाटावे या दृष्टीने त्यांच्यात चैतन्य निर्माण करायचे अशा दृष्टीने त्यांनी आपल्या कार्याची पाऊले पुढे टाकण्यास सुरुवात केली.

आपल्या भारत देशात इंग्रजांचे राज्य होते. चले जाव चा नारा देऊन इंग्रजांना देश सोडावा लागला आणि नंतर १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र्य झाला. भारतातल्या लोकांना विशिष्ट पध्दतीने राज्यकारभार करता यावा यासाठी भारताची स्वतंत्र्य राज्यघटना असणे आवश्यक झाले. त्या दृष्टीने भारतीय विद्वानांची एक घटना (तज्ञ) समिती नियुक्त करण्यात आली. तेव्हा पं. जवाहरलाल नेहरु व महात्मा गांधीनी ही जबाबदारी बॅरि. आंबेडकर यांच्यावर सोपविली, ती त्यांनी स्विकृत केली.

डॉ. बाबासाहेबांनी त्यांनी अहोरात्र जिद्द व चिकाटीने आपल्या अंगी असलेली सगळी बुध्दिमत्ता त्यांनी अहोरात्र प्राणपणाला लावून २ वर्षे ११ महिने १७ दिवसात घटना लिहून पुर्ण केली. दलित वर्गाचे पुढारी एवढ्या पुरतीच त्यांची भारतीय मान्यता नसून भारतीय स्वराज्यातील पहिले कायदेमंत्री पद त्यांना देण्यात आले. कायदा व घटनाशास्त्राचा त्यांचा गाढ अभ्यास हा त्यांच्या जीवनाचा एक स्वतंत्र पैलू होता. १९५० पासुन राज्यघटना अंमलात आली. डॉ. बाबासाहेबांनी लिहलेल्या संविधानामुळे भारताला जगात नावलौकिक मिळाले, असे म्हटले तर अतिश्योक्ती होणार नाही. तेव्हापासुनच त्यांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ओळखले जाऊ लागले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर जेवढी जबाबदारी होती तेवढी जबाबदारी जगातील कोणत्याही पुरुषावर नव्हती. ते जर अजुन जगले असते तर कदाचित त्यांच्या मनासारखे निश्चित घडले असते, हे कोणीही नाकारु शकत नाही आणि एवढा मोठा कायदेतज्ञ असलेल्या या महात्म्याचे पूर्वजीवन मात्र अत्यंत वाईट गेले असतांना बेदरकारपणे आगपाखड करता आली असती, पण ती सुध्दा त्यांनी केली नाही. अशावेळी देखील बहिष्कृतांच्या चळवळीला वर्ग लढयाचे स्वरुप येणे सहज शक्य होते, त्यातून भारतीय एकसंघतेला तडा जाऊन धर्माच्या नांवावर या देशाची शकले झाली. तशी परिस्थिती उद्भवली असती परंतू 'भारतीय' हा त्यांचा स्थायीभाव होता. भारतीय समाजात त्यांना बदल हवा होता पण त्यासाठी समाजप्रबोधन हाच मार्ग होय, अशी त्यांची दृढनिष्ठा होती. त्यामुळेच राष्ट्रनिष्ठा त्यांनी कधी सोडली नाही. राष्ट्रीय एकात्मतेचा विचार त्यांनी सर्वात महत्वाचा मानला.

पिकते तेथे विकत नाही हा सिध्दांत माहित आहे. तेव्हा आपल्याजवळ असलेल्या माणसाचे गुण आपण ओळखु शकत नाही, दूसऱ्या माणसाला त्याची पारख होते हे सर्वविदित आहे, म्हणूनच १ जून १९५२ रोजी अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठाने डॉक्टर ऑफ लॉ ही पदवी देऊन त्यांचा गौरव केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक तत्वज्ञानांचा तसेच सामाजिक/राजकिय संघर्षाचा वारसा लाभलेला असल्यामुळे हा समुह मूळत: प्रस्थापित विरोधी आहे, त्यांचा हिंदु धर्मातील पाखंडी संताना विरोध होता. भारत देशावर मात्र त्यांचे अलोट प्रेम होते, त्यामुळे हिंदु धर्मातून परधर्मात जाण्याचा विचार करतानाही भारतातच उगम पावलेल्या बौध्द धर्म याची नागपूर शहरात आपल्या लाखो अनुयायासह १४ ऑक्टोंबर, १९५६ रोजी बौध्द धम्माची दीक्षा घेतली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मतानुसार धर्माच्या कसोटीवर उतरणारा एकमेव धर्म आहे, तो म्हणजेच बुद्धधम्म होय. तेव्हा आपण जो धम्म घेतला तो उत्तमरीतीने पाळण्याचा निर्धार केला पाहिजे, नाहीतर महार लोकांनी तो निंदाजनक स्थितीत आणला असे होऊ नये म्हणून आपण दृढनिश्चय केला पाहिजे हे आपल्याला साधेल तर आपण आपल्याबरोबर देशाचा इतकेच काय तर जगाचाही उध्दार करु, कारण या धम्माचे लोन जागतिक पातळीवर उंचावले आहे. भारताच्या अलिकडील इतिहासात त्यांची कामगिरी उच्च श्रेणीची व चिरस्मरणीय अशीच आहे. अन ती दिवसेंदिवस वाढतच जाणारी आहे, हे त्यांच्या प्रखर विद्वत्त्वत्तेमुळे!

बाबासाहेब म्हणजे महान चारित्र्यवान व्यक्ति, अर्थशास्त्रज्ञ, शासनशास्त्रज्ञ, इतिहासाचे विद्वान, अभ्यासक, बुध्दिमान, कायदेपंडीत, स्मृतीकार, अनेक भाषांवर प्रभुत्व असलेला प्रभावी वक्ता, संशोधक, ग्रंथकार, निधडया छातीचा व मनोधैर्याचा समाज मार्गदर्शक, भगवान बुध्दांच्या कार्याचा संदेश सर्व जगात पसरविणारा, पददलितांचे स्फूर्ती व आशास्थान अशा या जागतिक कीर्तीच्या महामानवाला १३४ व्या जयंती निमित्त मानाचा मुजरा!

ज्ञानपिपासू युगांधराच्या आठवणींना स्मरू ।

मिळून आपण सारे साजरी भीम जयंती करू ।।

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त 'कर्मवीर'मध्ये व्याख्यान संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर (प्रतिनिधी) – येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती राष्ट्रीय सेवा योजना, प्राध्यापक प्रबोधिनी व समारंभ समिती यांच्या संयुक्त विद्यमाने साजरी करण्यात आली. या कार्यक्रमांतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शैक्षणिक प्रवास या विषयावर प्रा. डॉ. अमर कांबळे यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. यापुर्वी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संबंधित ग्रंथाचे प्रदर्शन भरविण्यात आले. याचे उद्घाटन प्रमुख मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. समाधान माने होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. प्रबोधिनीचे चेअरमन डॉ. उमेश साळुंखे यांनी केले, तर प्रमुख वक्त्यांचा परिचय समारंभ समितीचे चेअरमन डॉ. दत्तात्रय डांगे यांनी करून दिला. कार्यक्रमास कला विभागाचे अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बळवंत उपस्थित होते.

प्रा. डॉ. अमर कांबळे यांनी आपल्या भाषणात डॉ. आंबेडकरांच्या बालपणातील संस्कार, शैक्षणिक संघर्ष, आणि सामाजिक परिवर्तनासाठी त्यांनी उचललेल्या पावलांचा आढावा घेतला. त्यांनी डॉ. आंबेडकरांचे कार्य हे समाज, शिक्षण, कायदे, अर्थकारण, राज्यघटना, स्त्री सक्षमीकरण आणि कृषी-औद्योगिक धोरण यासारख्या अनेक क्षेत्रांमध्ये महत्त्वाचे असल्याचे अधोरेखित केले. तसेच सयाजीराव गायकवाड आणि शाहू महाराज यांच्या योगदानाचा ही त्यांनी विशेष उल्लेख केला. अध्यक्षीय भाषणात डॉ. समाधान माने यांनी डॉ. आंबेडकर यांच्या चळवळीची तुलना मार्टिन ल्युथर यांच्याशी करत, नव्या समाजनिर्मितीसाठी आंबेडकरी विचारसरणीचे महत्त्व अधोरेखित केले. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा डॉ. आंबेडकरांचा मूलमंत्र आजच्या तरुण पिढीसाठी मार्गदर्शक ठरतो, असे ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी स्वाती मनगिणी यांनी केले, तर आभार प्रा. डॉ. दत्तात्रय चौधरी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अभिजीत जाधव, ओंकार नेहतराव, अमोल माने, तानाजी खरात, अशोक भडकुंबे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास महाविद्यालयातील विविध विभागांचे प्रमुख, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निफाड महाविद्यालयाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड /प्रतिनिधी : मराठा विद्या प्रसारक समाजाचे कर्मवीर गणपत दादा मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय निफाड च्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

निफाड मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास मविप्र सभापती बाळासाहेब क्षीरसागर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. याठिकाणी प्राचार्य प्रोफे.(डॉ.) सुरेश जाधव यांनी भारतीय संविधान उद्देशिकेचे वाचन केले त्याच्या सोबत सर्वांनी सामूहिक रित्या उद्देशिका वाचली, यावेळी डॉ. उत्तमराव डेरले, प्राचार्य प्रोफ.(डॉ.) सुरेश जाधव, माधवराव गीते, यशवंत वडघुले, नंदलाल चोरडिया, शाम शिंदे, जानकीराम धाराराव, रामनाथ धारराव, सर्व प्राध्यापक व निफाड ग्रामस्थ यांनी बाबासाहेबांना विनम्र अभिवान केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार डॉ. महेश बनकर यांनी केले.

जयंती निमित्ताने निफाड महाविद्यालय ते आंबेडकर चौकापर्यंत रा.से.यो. आणि एन.सी.सी. च्या विद्यार्थ्यांच्या प्रभातफेरीचे सकाळी आयोजन करण्यात आले. निफाड महाविद्यालय ग्रंथालयात ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन झाले.

व्याख्यान प्रसंगी प्रा.पंकज गांगुर्डे यांनी डॉ. आंबेडकरांच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकत उद्बोधक असे व्याख्यान दिले. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य प्रोफे.(डॉ.) सुरेश जाधव यांनी समता बंधुता शिक्षण व नीतिमूल्य याचे महत्त्व विशद केले. प्रास्तविक प्रा. एन.डी. सोनटक्के यांनी केले, सूत्रसंचालन प्रा. प्रवीण शार्दुल तर आभार प्रा. डी.एम. मोगल यांनी मानले. यावेळी डॉ. प्रवीण ढेपले, प्रा.अभय वडघुले, डॉ. सुसान लॉरेन्सिया, प्रा. योगेश कडलग, एस.डी. गायकवाड, डॉ.आर.डी. शिंदे व सर्व प्राध्यापक,प्राध्यापिका शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी उपस्थित होते.





# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ठाकरे शिवसेनेच्या वतीने भिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर/अमर जाधव : शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त लातूर येथे पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी, सहसंपर्कप्रमुख नामदेव चाळक, महानगरप्रमुख सुनिल बसपुरे, युवा सेनेचे राहुल मातोळकर, विधानसभाप्रमुख एस आर चव्हाण, अल्पसंख्याक सेनेचे मुनीरभाई शेख,

माजी उपजिल्हाप्रमुख शंकर रांजणकर, कामगार सेनेचे तानाजी करपुरे, शहर समन्वयक राजू कतारे, शहर संघटक दिलीप भांडेकर, शिवराज मुळावकर,योगेश सिरसाट, उपशहरप्रमुख भास्कर माने, राहुल रोडे, योगेश पाटील आदी उपस्थित होते..!

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या चरित्र ग्रंथाचे चिंतन व्हावे

## मल्लिनाथ कल्याणशेट्टी; कल्याणशेट्टी महाविद्यालयात अभिवादन कार्यक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी उच्च शिक्षण घेतल्यानंतर समाजातील वंचित, उपेक्षित व दलित समाजाला न्याय मिळावा म्हणून संघर्ष केला. युवकांना शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा असा संदेश दिला. म्हणून त्यांच्या चरित्र ग्रंथातून आदर्श घेऊन विद्यार्थ्यांनी उच्चविद्याविभूषित व्हावे, असे मत मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले. महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राज्यशास्त्र विभागाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते. पुढे ते म्हणाले की, डॉ आंबेडकर यांनी दुर्मिळ ग्रंथांचे वाचन केले, स्वतःचे व्यक्तिमत्त्व घडविले. भारताचे संविधान लिहून विद्वत्ता सिद्ध केली. शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे त्यांनी जाणले होते. दलित समाजातील मुलांना उच्च शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न सर्वश्रुत आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. शितल झिंगाडे-भस्मे यांनी केले. सूत्रसंचलन प्रा. मधुबाला लोणारी यांनी केले तर आभार प्रा. डॉ. बाळासाहेब पाटील यांनी मानले. कार्यक्रमास प्रा मनीषा शिंदे, प्रा विद्या बिराजदार, स्वप्नाली जमदाडे, विकास तळवार आदी प्राध्यापक उपस्थित होते.



### राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकाकडून मानवंदना

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मानवंदना देण्यात आली. यावेळी कार्यक्रमाधिकारी प्रा. राजशेखर पवार उपस्थित होते.

# पंढरपुरातील चंद्रभागेच्या पात्रात घुमला 'जय भीम' चा नारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर (प्रतिनिधी) : आज पंढरपुरातील चंद्रभागेच्या पात्रात होडी मध्ये महात्मा ज्योतिबा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व आद्यक्रांतीकारक राघोजी भांगरे यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर चंद्रभागेच्या पात्रात होडीमधून भव्य अशी मिरवणूक काढत गुरू शिष्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

पंढरीतील महर्षी वाल्मिकी संघाच्या वतीने सालाबादप्रमाणे याही वर्षी हा गुरू-शिष्य जयंतीचा सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी चंद्रभागेचे वाळवंट क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचा विजय असो, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विजय असो, आद्यक्रांतीकारक राघोजी भांगरे यांचा विजय असो, बोलो रे बोलो जय भीम बोलो! च्या घोषणांनी दुमदुमून गेलेला आढळून आला. यावेळी बोलताना महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव म्हणाले की, सालाबादप्रमाणे याही वर्षी आम्ही समतेची शिकवण देणा-या व संतांची भुमी असलेल्या भुवैकुंठ पंढरी नगरीत चंद्रभागेच्या पात्रात असलेल्या आद्यक्रांतीकारक राघोजी भांगरे यांच्या स्मारकासमोर महात्मा ज्योतिबा फुले व महामानव, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व होडीमधून भव्य अशी मिरवणूक काढली. महामानवांचे विचार हे आपल्या तरूणाईला प्रेरणा देणारे असतात त्यामुळे हे विचार चिरंतनपणे जिवंत रहावेत यासाठी आम्ही सतत प्रयत्न करू. असे मतही यावेळी गणेश अंकुशराव यांनी व्यक्त केले. यावेळी गणेश अंकुशराव, अनिल अधटराव, गणेश तारापूरकर, सुरज कांबळे, अप्पा करकमकर, सुहास साळुंखे, सचिन नेहतराव, माऊली कोळी, दत्तात्रय कोरे, सोमनाथ करकमकर, निखील करकमकर व असंख्य तरुण कार्यकर्ते उपस्थित होते.

**महर्षी वाल्मिकी संघाने होडीत साजरी केली गुरू, शिष्य महात्मा फुले व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती, होडीतून काढली भव्य मिरवणूक**



# पंढरपुरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर दिनांक १४ भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मा श्री राजेंद्र कोरके पाटील महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष, व सामाजिक कार्यकर्ते राजू पवार, यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी श्री दिनेश सगरे, अंकुश शेळके, रामचंद्र बिराजदार, राजू पवार, राजू माळी, श्री शिकलकर, श्री डोंगरे, दत्ता काळे, बाळासाहेब सगरे, तात्या फडतरे, श्री मंगेश मामाने, श्री स्वामी विवेकानंद चौकातील सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास प्रशासनाच्या वतीने पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.



यावेळी आमदार राजू खरे, प्रांताधिकारी सचिन इथापे, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, तहसिलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी डॉ.प्रशांत जाधव, गट विकास अधिकारी सुशील संसारे, पोलीस निरिक्षक विश्वजीत घोडके, उपमुख्याधिकारी अँड.सुनिल वाळुजकर, आरोग्य अधिकारी शरद वाघमारे, नागनाथ तोडकर, नेताजी पवार, राजकुमार काळे, कृष्णात जगताप यांच्यासह पदाधिकारी, मान्यवर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डुबेरे येथील जनता विद्यालयात डॉ. आंबेडकर यांना अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी : डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात भारतीय घटनेचे शिल्पकार, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक रंगनाथ उगले होते.व्यासपीठावर पर्यवेक्षक उल्हास पवार,ज्येष्ठ शिक्षक सोमनाथ पगार, विद्या ठाकरे,कचेश्वर शिंदे, सोमनाथ गिरी ,सुनिल ससाणे,वरिष्ठ लिपिक राणी शिंदे, रोहिणी भगत आदी उपस्थित होते. उपस्थितींच्या हस्ते डॉ .आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मुख्याध्यापक रंगनाथ उगले, उपशिक्षिका जयश्री गोहाड यांनी डॉ. आंबेडकर यांच्या जीवन व कार्याचा परिचय करून दिला.सूत्रसंचालन पी.आर.करपे यांनी तर आभार रामदास वारुंगसे यांनी मानले. यावेळी डी.ए.रबडे, सीमा गोसावी, सोमनाथ बोडके, शिवाजी गुरुळे , उत्तम कामडी,रेवणनाथ कांगणे,रवि गोजरे, किशोर शिंदे,ज्ञानेश्वर कडभाने आदींसह शिक्षक ,शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त गरजू शालेय विद्यार्थ्यांना सायकल वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती टायगर ग्रुप अक्कलकोट यांच्या वतीने आंबेडकर जयंती निमित्त गरजु शालेय विद्यार्थ्यांना सायकल वाटपाचा कार्यक्रम अक्कलकोट तालुक्याचे लोकप्रिय आमदार सचिन दादा कल्याण शेट्टी यांच्या हस्ते करण्यात आला.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त टायगर ग्रुपच्या वतीने यंदाच्या वर्षीचा मिरवणुकीचा खर्च टाळून एक सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.



यावेळी टायगर ग्रुपच्या कडुन राबविण्यात येणाऱ्या सामाजिक कार्याचे कौतुक आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले व जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी रॉयल नगरसेवक मिलन दादा कल्याणशेट्टी, माजी उपनगराध्यक्ष यशवंत तात्या धोंगडे, महेश मालक हिंडोळे, शिवशरण जोजन, अविनाश मडीखांबे,मंडळाचे संस्थापक अध्यक्ष सागर भाऊ शिरसाट, अमर शिरसाट, निशांत निंबाळकर, वैजुनाथ मुकडे,बिरू सरवदे, सौ पुजा सागर शिरसाट,सौ.अंजली शिरसाट,सौ. सुजाता बिराजदार,आकाश जाधव, शरणू किणीकर, गणेश पवार, सिद्धाराम माळी, रमेश काका कापसे, दयानंद बिडवे, राहुल ढोबळे, संजय जमादार, शुभम बहिरेवार, तुकाराम पुजारी, नागराज कुंभार, आकाश माने आदि उपस्थित होते.

## 'शहरी माओवाद आणि महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा कायदा' यावर व्याख्यान

### अ‍ॅड. संदीप जाधव यांचे प्रतिपादन

# शहरी माओवाद रोखण्यासाठी जनसुरक्षा कायदा गरजेचा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी

शहरी माओवाद रोखण्यासाठी जनसुरक्षा कायदा गरजेचा असे मत ड संदीप जाधव विधीज्ञ मुंबई हायकोर्ट, यांनी केले व माओवादाचे अभ्यासक अ‍ॅड. संदीप जाधव यांचे 'शहरी माओवाद आणि महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा कायदा' या विषयावर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने विशेष व्याख्यान दयानंद शिक्षण संस्था आणि विवेक विचार मंच सोलापूर वतीने दयानंद कॉलेज येथील महर्षी दयानंद सरस्वती सभागृहात दिनांक १२ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आले होते. यावेळी मंचावर दयानंद शिक्षण संस्थेचे प्रशासक प्रा. उबाळे सर, शिक्षण शास्त्र विभागाचे प्रा. क्षीरसागर सर, कला व शास्त्र विभागाचे प्रा. दामजी सर, विधी महाविद्यालयाचे गायकवाड मॅडम, ड विशाल बागडे तसेच विवेक विचार मंचाच्या जिल्हा संयोजिका अश्विनी चव्हाण आधी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात संविधानाच्या उद्देशपत्रिकाचे सामूहिक वाचनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शिंदे सर यांनी केले , प्रास्ताविक प्राध्यापक कटाप सर यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.घनाते सर यांनी केले आणि अध्यक्षीय मनोगत श्री उबाळे सर यांनी व्यक्त केले. यावेळी सर्व विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.

सुदृढ लोकशाहीसाठी विशेष जनसुरक्षा कायदा हवा कारण लोकशाहीविरोधी कम्युनिस्ट माओवादी संघटनांनी गेल्या पन्नास वर्षात हजारो सुरक्षारक्षक, पोलीस, जवान तसेच शेकडो दलित, आदिवासी बांधवांचे हत्याकांड केलेले आहे. आज केंद्र व राज्य सरकार जंगलातील माओवाद्यांच्या विरोधात अत्यंत कठोर कारवाई करत आहे. अनेक माओवादी शरण येत आहेत. विकासाच्या योजना राबविल्या जात आहेत. शहरातील जास्त धोकादायक समाजविघातक माओवादी, फुटिरतावादी गट मोकाट सुटू नये यासाठी विशेष जनसुरक्षा कायद्याची गरज आहे.

माओवाद काय आहे, माओवादी संघटना कशा काम करतात, त्यांना रोखण्यासाठी काय करण्यात आले, याबाबतचे कायदे कोणते आहेत, शहरी माओवाद काय आहे, तसेच महाराष्ट्र जन सुरक्षा कायद्या संदर्भात जे भ्रम आणि गैरसमज नागरिकांमध्ये पसरवले जात आहेत त्याचा त्यांनी प्रतिवाद या सभेतून केला. आणि कायद्यातल्या महत्त्वाच्या तरतुदी त्यांनी श्रोत्यांना उलगडून सांगितल्या. आपल्या भाषणाच्या शेवटी वक्त्यांनी सर्वांना कायद्याचे समर्थन करण्याचे आवाहन केले. ड.संदीप जाधव यांच्या भाषणातील काही प्रमुख मुद्दे पुढीलप्रमाणे



- माओवाद आता केवळ ग्रामीण आणि आदिवासी भागापुरता मर्यादित राहिलेला नसून त्याचे शहरात देखील प्रमाण वाढत आहे. औद्योगिक क्षेत्र असलेल्या भागात माओवाद वाढत आहे. पायाभूत सुविधांपासूनच्या उणिवा, बौद्धिक व जातीयवाद करून समाजाला ज्या-ज्या भागात विभागता येईल, त्या त्या ठिकाणी विभागणी करण्याचे काम माओवादी करत आहेत. त्यासाठी दलितांना मिलिटेंट बनवण्यात येत आहे.

- माओवाद्यांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर विश्वास आहे. बाबासाहेबांचे नाव ते घेतात मात्र राज्यघटनेला ते विरोध करतात.

- देशातील सुरक्षा यंत्रणांनी केलेल्या कारवाईत आतापर्यंत अनेक माओवाद्यांना अटक करण्यात आली आहे. मात्र त्यांना शिक्षा होत नसल्याचे प्रकार घडले आहेत, यामागची कारणमीमांसा लोखंडे यांनी मांडली. अनेकदा घटना घडल्यानंतर तेथील पुरावे नष्ट करण्यात येतात. आरोपींनेच गुन्हा केला आहे, हे सिद्धच होत नाही. पुरावे पोलिसांनीच तयार केले आहेत, असे मांडले जाते. चुकीचे नरेटिव्ह सेट केले जाते. आरोपींना कायद्यातील त्रुटींचा फायदा होतो, त्यामुळे ते सुटतात.

- माओवादी चळवळीचा उगम कम्युनिस्ट चळवळीतून झाला. नंतरच्या काळात त्यास विविध ग्रुपमध्ये विभागले गेले. त्यामध्ये ग्रामीण आणि शहरी या दोन्ही भागांत त्यांची चळवळ सुरू राहिली. परंतु समाजातील विविध संस्था आणि संघटनांच्या माध्यमातून मुंबईसारख्या शहरात माओवाद टिकून राहिला. त्यामुळे नक्षलवादाची सुरुवात ग्रामीण भागात झाली नसून, शहरी भागात झाली.

नलक्षवाद्यांनी समाजातील कामगार, मजूर, शेतकरी यांना लालसेपोटी आकर्षित केले. त्यांच्या या कृतीला नागरिक बळी पडतात. त्यामुळे नक्षलवादी चळवळ जोमाने सुरू झाली. या नक्षलवाद्यांकडून सरकार आणि लोकशाही विरोधात लढण्यासाठी एक प्रकारे जाळे निर्माण करण्यात आले. शिवाय या चळवळीचा विस्तार आता संपूर्ण देशभर पसरला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा' या संवैधानिक मार्गाला खोडून पाहणाऱ्या नक्षलवादी चळवळींच्या सामाजिक शांतता भंग करण्याच्या उद्देशाने घडल्या गेलेल्या चळवळींचे आणि विवादित आंदोलनाचे मुख्य उद्देश्य एडवोकेट संदीप जाधव यांनी अधोरेखीत केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आचार, विचार आणि कर्तृत्वाचा जयजयकार करावा : प्राचार्य डॉ. संजय चाकणे

## स्वेरीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती उत्साहात साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर (तालुका प्रतिनिधी) :'आपली सदसदविवेकबुद्धी जागृत ठेवून कार्य केल्यास यशाची शक्यता वाढते त्यासाठी आपण स्वत:शी संवाद साधला पाहिजे. आपण आपल्याशी बोललो की खरं काय आणि बरं काय हे समजते. एकूणच आपण आपल्या दु:खात गुरफटतो. त्यामुळे त्याचे ओझे वाहताना खऱ्या आनंदाला मुकतो. 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत', 'हु वेअर दि क्षुद्राज' अशी अनेक पुस्तके डॉ. आंबेडकरांनी लिहिली. डॉ. आंबेडकरांच्या लिखाणातून तत्कालीन समाजसंस्कृती डोकावते. डॉ. आंबेडकरांची जयंती केवळ जयजयकारापर्यंतच नको तर त्यांच्या आचार, विचार आणि कर्तुत्वाचा जयजयकार केला पाहिजे.' असे प्रतिपादन टिकाराम जगन्नाथ महाविद्यालय, खडकी, पुणे चे प्राचार्य डॉ. संजय चाकणे यांनी केले.





स्वेरीमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. संजय चाकणे हे मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी त्रिवेंद्रम (केरळ)च्या आयपीएस अधिकारी अंजना कृष्णा व्ही.एस. ह्या होत्या. महाराष्ट्र गीत व स्वेरी गीताने कार्यक्रमाला सुरवात झाली. भारतरत्न डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमा पूजनानंतर स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी सर्व पाहुण्यांचे स्वागत करून प्रास्तविकात 'एका सर्व सामान्य कुटुंबात जन्म झालेल्या डॉ. आंबेडकरांनी अनेक संकटांचा सामना करून उच्च शिक्षण घेतले. त्या काळी दुर्दैवाने आपल्याच समाजाच्या एका घटकाला माणूस म्हणून जगण्याची मुभा नव्हती अशा काळात 'शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा' हा संदेश देऊन समाजाला बळ देण्याचे महान कार्य डॉ. आंबेडकरांनी केले. म्हणून 'माणसाला माणूस म्हणून वागणूक मिळाली पाहिजे' या थोर विचारांच्या भक्कम पायावर पुढे डॉ. आंबेडकरांनी समाजाची परिस्थिती बदलण्यासाठी कार्य केले.' असे सांगून डॉ. आंबेडकर यांचे कार्य व कर्तुत्वावर प्रकाश टाकला. पुढे बोलताना प्र.पाहुणे प्राचार्य डॉ. संजय चाकणे म्हणाले की, 'डॉ. बाबासाहेब मनामनामध्ये रुजवायचे असतील तर आपली वैचारिक पातळी सुधारण्याची गरज आहे. यासाठी प्रथम आपल्या हाताखालील माणसं मोठी करा आपण आपोआप मोठे होतो. इंजिनिअर तर सर्वच जण होतात पण 'शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी इंजिनिअर व्हा'. असे आवाहन डॉ. चाकणे यांनी केले. अध्यक्षीय भाषणातून आयपीएस अधिकारी अंजना कृष्णा व्ही.एस. यांनी शिक्षणाचे महत्व आणि प्रशासकिय यंत्रणेतील योगदान याबाबत म्हणाल्या की, 'शाळा, कॉलेजेसचे आमंत्रण मी नेहमी स्वीकारते कारण मला विद्यार्थ्यांसोबत संवाद साधायला आवडते. मी केरळमधील एका मध्यमवर्गीय कुटुंबातून आहे. शाळेमध्ये असताना माझा प्रथम क्रमांक कधीच नव्हता आणि मी एक सामान्य विद्यार्थिनी होते. पदवीच्या शिक्षणानंतर मी यूपीएससीची तयारी सुरू केली. परीक्षेमध्ये काही गोष्टी आपल्या नियंत्रणात असतात तर काही गोष्टी आपल्या नियंत्रणात नसतात. ज्या गोष्टी आपल्या नियंत्रणात आहेत त्याच गोष्टींवर आपण भर दिला पाहिजे. परीक्षा मधील चुकातून शिकण्याने आपण खऱ्या अर्थाने घडत असतो. अपयश हे कधीही शेवटचे नसते. त्यामुळे परिश्रमात सातत्य ठेवल्यास आपले ध्येय गाठता येते. यासाठी सकारात्मक विचाराने अभ्यास करा आणि हे सर्व शिक्षणाने साध्य होते.' असे सांगून स्पर्धा परीक्षेबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी देखील स्पर्धा परीक्षेबाबत कुतूहलाने प्रश्न विचारले असता आयपीएस अधिकारी अंजना कृष्णा व्ही.एस. यांनी समर्पक उत्तरे दिली. पुणे येथे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजिलेल्या 'डिपेक्स' या राष्ट्रीय स्तराच्या संशोधन परीक्षेत स्वेरीच्या विद्यार्थ्यांनी प्रथम व द्वितीय क्रमांक मिळवला त्याबद्दल विजेत्या स्पर्धकांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. 'स्वेरीयन' या त्रैमासिक अंकाचे प्रकाशन देखील यावेळी करण्यात आले. यावेळी स्वेरीचे माजी अध्यक्ष व विश्वस्त एन.एस. कागदे, स्वेरीचे माजी अध्यक्ष व विश्वस्त धनंजय सालविठ्ठल, विश्वस्त एच.एम.बागल, विश्वस्त बी.डी. रोंगे, युवा विश्वस्त प्रा.सुरज रोंगे, किर्लोस्कर कंपनीचे एच.आर. ऋषिकेश कुलकर्णी, बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम.जी. मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.एन. डी. मिसाळ, डी. फार्मसीचे प्राचार्य प्रा. सतीश मांडवे, डिग्री इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, विद्यार्थिनी सचिवा नम्रता घुले यांच्यासह स्वेरी संचलित अभियांत्रिकी व फार्मसीचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी व चारही महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते. साक्षी शिंदे व प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ. यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन केले तर स्वेरीचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे यांनी 'शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा' या ब्रीद वाक्याचे स्पष्टीकरण देऊन सर्व उपस्थितांचे आभार मानले.




## येडेश्वरी देवीच्या यात्रेदरम्यान पालखीवर हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी



**श्री तुळजाभवानी देवीची धाकटी बहिण म्हणून नावलौकिक असलेल्या येरमाळा ता.धाराशिव येथील येडेश्वरी देवी लाखो भाविक या यात्रेत सहभागी झाले आहेत. देवीच्या यात्रेदरम्यान पालखीवर हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी करण्यात आली. हा आनंद सोहळा विशेष समाधान देणारा ठरला.**

# नागणसुर येथील श्री गुरू बसवलिंगेश्वर शिक्षण कला व क्रीडा बहुउद्देशीय संस्थेचे उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी

नागणसुर येथील श्री गुरू बसवलिंगेश्वर शिक्षण कला व क्रीडा बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड शाळेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास होण्यासाठी सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी बसव कलामंच बांधून नाम करण व लोकार्पण सोहळा डॉ.अभिनव बसवलिंग महास्वामीजींच्या हस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाले.



कार्यक्रमाच्या दिव्य सानिध्य डॉ.अभिनव बसवलिंग महास्वामिजी भूषविले होते.अध्यक्षस्थानी गावचे ज्येष्ठ नागरिक शेतकरी सोसायटीचे चेअरमन बसनिंगप्पा थंब होते.उपाध्यक्षस्थानी गावचे माजी उपसरपंच धनराज धनशेट्टी होते.व्यासपीठावर प्रसाद प्रचंडे,बसवराज

### नागणसुर कन्नड शाळेत बसव कलामंच नामकरण व लोकार्पण सोहळा संपन्न

नागलगांव, शशिकांत कळसगोंडा,बसवराज मंटगी, विश्वनाथ प्रचंडे,बसवराज खिलारी, धरेप्पा तोळणूरे,सिद्धाराम शिवमूर्ती आदी उपस्थित होते.

प्रारंभी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गंगाधर भोसगी, बसनिंगय्या स्थावरमठ यांच्या हस्ते श्री.बसवलिंगेश्वर महास्वामिजी आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे प्रतिमापूजनाने सुरुवात झाली. बसव कलामंचाच्या पूजन गुरुराज विभुते,प्रकाश पाटील यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. डॉ.अभिनव बसवलिंग महास्वामीजींच्या हस्ते नामकरण व लोकार्पण करण्यात आले.

डॉ.बसवलिंग महास्वामिजी पुढे बोलताना म्हणाले की,आयुष्यात जन्म दिलेल्या आई व जन्म झालेला भूमी सर्व श्रेष्ठ आहे. म्हणून जन्मदाते आणि जन्मभूमीला कधीही विसरू नये या उदात्त भावनेने संस्थेचे लोक एकत्र येऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती आणि सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी कलामंच बांधून दिले असून भविष्यात याच कलामांचातून देशाचे सर्वश्रेष्ठ कलाकार,उत्तम वक्ता तयार होतील या कार्य प्रशंसनीय आणि अनुकरणीय आहे असे कौतुक केले.

बसव कला मंचाचे बांधकाम साठी लागणारे साहित्य गुरुराज विभूते यांनी त्यांच्या वडील कै.बसलिंगप्पा गुरबसप्पा विभूते यांचे स्मरणार्थ मोफत दिले. प्रकाश पाटील यांनी देणगी बरोबर मोफत फरशी दिलें. श्री गुरु बसवलिंगेश्वर शिक्षण कला व क्रीडा बहुउद्देशीय संस्था, नागणसूर येथे प्रामाणिकपणे काम करत असल्याचे मत तंटामुक्त समितीचे माजी अध्यक्ष मल्लिनाथ कल्याण यांनी व्यक्त केले. संस्थेचे सदय राजू नाविंदगी, राजकुमार गुरव, गुरुबाई प्रचंडे आदींनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन शरणप्पा फुलारी यांनी केले. प्रस्तावना संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा.धरेप्पा नागणसुरे यांनी केले. शेवटी संस्थेचे सचिव प्रा. बसवराज विभूते यांनी आभार मानले. कन्नड मुली शाळेच्या विद्यार्थिनी स्वागत गीत आणि ईशस्थवन सादर केले.

दोन्ही शाळेतील विद्यार्थी विविध मनोरंजनाची कार्यक्रम करून कलामंचाचे औपचारिक उद्घाटन केले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी केंद्रीय मुख्याध्यापक विद्याधर गुरव,श्रीशैल दोडमनी,बसवराज स्वामी,राजकुमार खानापुरे,राजकुमार नरूणे,लक्ष्मीकांत तळवार ,शिवशरण म्हेत्रे,खाजप्पा कीणगी, शरणप्पा फुलारी,राजशेखर कुर्ले,शांता तोळणूरे,विजयश्री एंटमन, चन्नम्मा बिराजदार संस्थेचे पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

### रमाबाई आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अणावरण व पुनर्निर्मित विहाराचे उद्‌घाटन

### प्रा. मुन्नाभाई नंदागवळी यांचे प्रतिपादन

# मानव जातीच्या प्रत्येक घटकाचे उध्दारकर्ते फक्त डॉ.बाबासाहेब आंबेडकरच

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवेगावबांध : मानवाने पृथ्वीतलावर जन्म घेतला की गरजासह आवश्यक बाबी पूर्ण कराव्यात लागतात. पण याबरोबरच वैचारिक गरजही ही मणसाला माणूस म्हणून जगण्यासाठी पाहिजेच असते. अशावेळी वैचारिक गरज ही महापुरुषांच्या विचाराने, कार्याने भागवता येते. बाबासाहेब आंबेडकर नसते तर मागासलेला समाज व माणूस हा मी माणूस म्हणून जगलच नसता, कारण वर्णव्यवस्थेने बरबटून ठेवले होते, ते सर्व मोकळे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. माणसाला माणूस म्हणून नवे जीवन देणारे केवळ डॉ बाबासाहेब आंबेडकर आहेत. ही सारी कमाई, व पुण्याई फक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचीच आहे. म्हणून मानव जातीच्या प्रत्येक घटकाचे उध्दारकर्ते फक्त डॉ.बाबासाहेब आंबेडकरच आहेत ...! असे प्रतिपादन आंबेडकरवादी साहित्याचे अभ्यासक प्रा. मुन्नाभाई नंदागवळी यांनी केले. ते कार्यक्रमाचे मुख्य व्याख्याते म्हणून बोलत होते.




यावेळी विचार मंचावर नागपूरचे ज्योतीबा बारसागडे यांनी उद्घाटन केले तर विनोद चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली विशेष अतिथी डॉ. चंद्रशेखर बांबोळे, नवेगावबांधचे हरिश्चंद्र लाडे, गोंदियाच्या अश्विनी भावे होते. प्रमुख अतिथी म्हणून रमाबाईची मुर्ती दानदात्या लिला माने, रिपाई नेते अशोक रामटेके, तन्हा नागपुरी, राहुल शामकुवर, श्री खापर्डे, श्री. साखरे, सरपंच सरस्वता चाकाटे, पो. पा. हेमलता खोब्रागडे, इंजि. अमित शहारे, प्रभाकर दहिकर, धम्मदीप मेश्राम, सुरेश खोब्रागडे, मनोरेश्वर सौंदरकर, अनिल कांबळे, एम. जी. मेश्राम, परसराम माने, स्मिता मेश्राम, वैशाली नंदेश्वर, आकाश नंदेश्वर, तथा गावातील प्रतिष्ठित नागरीक मंचावर उपस्थित होते.

सदर कार्यक्रम करुणा बोध्द विहार बाराभाटी येथे दिनांक १३ एप्रिल रोजी संपन्न झाला. अशाप्रकारे बाराभाटी येथे माता रमाबाई आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अणावरण तसेच पुर्ननिर्मित विहाराचे उद्घाटन करण्यात आले.

याप्रसंगी तथागत गौतम बुद्ध, महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर व रमाबाई आंबेडकर यांच्या पुतळ्यंना माल्यार्पण करून मान्यावरानी अभिवादन केले. निळे ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.

समाजातील घटकांना मार्गदर्शन करताना पुढे म्हणाले- प्रा. मुन्नाभाईन्नाभाई नंदागवळी म्हणाले- पुतळा उभारा ते मानव घटकांना दिशादर्शक आहेत. त्यांनी सांगितलेले विचारांवर आपण चालले पाहिजे. मात्र विटंबना होणार नाही याची काळजी घ्यावी. कुणाचा जीव जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

चंद्रशेखर बांबोळे म्हणाले- डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी समाजातील नाही तर जगासाठी आपले जीवन खर्ची केले. त्याची जाणीव आपण ठेवली पाहिजे.

हरिश्चंद्र लाडे म्हणाले- डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान देऊन भारतीय समाजाला नवे जीवन दिले. असे मार्गदर्शन केले.

लिला माने यांनी समाजासाठी कमाईच्या हिस्सातून माता रमाबाई आंबेडकर यांचा पुतळा दान दिला. त्याबद्दल माने यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रफुल्ल वालदे यांनी केले, संचालन चंद्रशेखर तिरपुडे यांनी करुन आभार नितीन कांबळे यांनी मानले. तर यशस्वीतेसाठी मनोहर कांबळे, मच्छिंद्र देशभ्रतार, सुदाम कराडे, पृथ्वीराज खोब्रागडे, धिरज नंदेश्वर, हिवराज मेश्राम, योगराज जांभूळकर, तसेच समस्त गावकरी यांनी चांगली मेहनत घेतली.